# 'जिओइन्फॉर्मेटिक्स'च्या १७ विद्यार्थ्यांना संधी

## विविध राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये नोकरी



कोल्हापूर, ता. २ : शिवाजी विद्यापीठातील भूगोल अधिविभागामधील जिओइन्फ्रोर्मेटीक्स (भौगोलिक माहिती प्रणाली) या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थांची विविध आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय संस्थांमध्ये निवड झाली. यामद्ये स्टुडिओ गॅली (पनामा ग्रुप), जेनसी इंटरनॅशनल, डिडुस टेक्नॉलजीस संस्थांचा समावेश आहे. विशेष म्हणजे काही विद्यार्थांची निवड हि लॉकडाऊन काळामध्ये वर्कफ्रॉम होम या आधारे वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये झाली होती. याच बरोबर काही विद्यार्थी अग्रीकल्चर ऑफिस कोल्हापूर येथे जी.आय.एस टेक्नेशियन्स म्हणून रुजू झाले आहेत. २०१९-२० या शैक्षणिक वर्षामध्ये जी.आय.एस टेक्नीक, जी.आय.एस ॲनॅलिस्ट, जी.आय.एस.एक्झेकेटीव्ह, जी.आय. एस डेव्हलपर्स म्हणून काम करण्याची संधी प्राप्त झाली आहे. या वर्षी जागतिक कोरोना संसर्गजन्य परिस्थिती असताना देखील जवळपास ८० टक्के पेक्षा अधिक विद्यार्थांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये संधी प्राप्त झाली. निवड झालेल्या विद्यार्थामध्ये ऋषिकेश देवकुळे, अनुराग कुलकर्णी, मारुती चिलामे, प्राजक्ता घाटगे, दीपक क्षीरसागर, प्राजक्ता कुंभार, शीतल कातावर, अक्षय पाटील, आशिष पाटील, विशाल पाटील, तुषार वाघ, वैष्णवी साळुंखे, सुशांत सौन्दाडे, रागिणी थालाल यांचा समावेश आहे. यासाठी यांना अधिविभागप्रमुख डॉ. एस. डी. शिंदे, डॉ. एस. एस. पन्हाळकर, डॉ. पी. टी. पाटील, प्रा. अभिजित पाटील, प्रा. व्ही. ए. चौगुले व प्रा. सुधीर पोवार यांचे मार्गदर्शन लाभले.

# ‘जिओइन्फॉर्मेटिक्स’ च्या १७ विद्यार्थांना संधी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील भूगोल अधिविभागामधील जिओइन्फॉर्मेटिक्स (भौगोलिक माहिती प्रणाली) या पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाच्या १७ विद्यार्थांची विविध राष्ट्रीय आणि बहुआंतराष्ट्रीय कंपन्यांमध्ये निवड झाली. विशेष म्हणजे काही विद्यार्थांची निवड लॉकडाऊन काळामध्ये वर्कफ्रॉम होम याआधारे वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये झाली होती.



काही विद्यार्थी अग्रीकल्चर ऑफिस कोल्हापूरमध्ये रुजू झाले आहेत. यामध्ये ऋषीकेश देवकुळे, अनुराग कुलकर्णी, मारुती चिलामे, प्राजक्ता घाटगे, दीपक क्षीरसागर, प्राजक्ता कुंभार, शीतल कातावर, अक्षय पाटील, आशीष पाटील, विशाल पाटील, तुषार वाघ, वैष्णवी साळुंखे, सुशांत सौंदाडे, रागिणी थालाल यांचा समावेश आहे. त्यांना अधिविभागप्रमुख डॉ. एस. डी. शिंदे, कोर्स को- ऑर्डिनेटर डॉ. एस. एस. पन्हाळकर, डॉ. पी. टी. पाटील, प्रा. अभिजित पाटील, प्रा. व्ही. ए. चौगुले व प्रा. सुधीर पोवार यांचे मार्गदर्शन लाभले.

# 'द अनबिटेबल' प्रेरणादायी पुस्तक

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, विद्यापीठात प्रकाशन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

अधिकाधिक उत्तम काम करण्यासाठी 'द अनबिटेबल' हे पुस्तक प्रेरणा देते. विद्यार्थी, शिक्षक, पालकांनी ते आवर्जून वाचायला हवे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. वाठार येथील डॉ. अजय मस्के आणि अश्विनी कांबळे यांनी लिहिलेल्या 'द अनबिटेबल : एन एनलाइटन्ड पिक परफॉर्मर' या पुस्तकाचे प्रकाशन कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी तुरची-तासगाव येथील महाराष्ट्र पोलीस प्रशिक्षण केंद्राच्या प्रमुख पोलीस अधीक्षक ज्योती क्षीरसागर म्हणाल्या, डॉ. मस्के यांनी आयुष्यात सुरवातीपासून विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्याचे काम अंगीकारले, त्याची मी साक्षीदार आहे.



कोल्हापूर : 'द अनबिटेबल' पुस्तकाचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, सोबत अन्य मान्यवर.

बाळासाहेब माने शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष विजयसिंह माने यांनीही मनोगत व्यक्त केले. कौस्तुभ बारवडे यांनी स्वागत केले. अश्विनी कांबळे यांनी पुस्तक परिचय करून दिला. डॉ. अजय मस्के यांनी आभार मानले. जि.प. सदस्या मनीषा माने, डॉ. श्रीकांत पाटील, वारणा कालवे विभाग इस्लामपूरचे कार्यकारी अभियंता डी. डी. शिंदे, मनीष आपटे, विक्रांत हलगली, नितीन माणगावे, साई प्रसाद, उमेश सुतार, सूरज चौगुले, अजित शिंदे, सूरज चव्हाण, ओंकार मगदूम आदी उपस्थित होते.